# मनात आलं म्हणून



लेखक - पंकज घारे

# मनात आलं म्हणून

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान


सादर करीत आहे

# मनात आलं म्हणून

लेखक :

पंकज घारे

**लेखक परिचय -**



संपूर्ण नाव: पंकज प्रतिभा-प्रकाश घारे

पत्ता- वास्तु-वृंदावन, सेक्टर ८ए, ऐरोली, नवी मुंबई.

mr_ghare@yahoo.co.in

भ्रमणध्वनी क्रमांक : ९८१९ ६६३ ६३०

**शिक्षण** -

**पदविका**: यंत्र अभियांत्रिकी, वीरमाता
जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इंस्टीट्यूट, माटुंगा, मुंबई.

**पदवी**: यंत्र अभियांत्रिकी, सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनअरिंग, अंधेरी, मुंबई.

**ई- पुस्तक मुखपृष्ठ**: श्री. विकास परब.

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
www. esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp: 7710980841
APP :
https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks


**प्रकाशन : १५ ऑगस्ट २०१८**


©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे.

**<u>पंकज घारे यांची प्रकाशित पुस्तके आणि इतर ओळख</u>**

१. <u>पहिले पाऊल</u> (सर पास- हिमालयीन गिर्यारोहण अनुभव)- संवेदना प्रकाशन (आता फक्त ई-पुस्तक उपलब्ध)
https://www.bookganga.com/eBooks/Books/Index?BookSearchTags=Pankaj%20Ghare&BookType=1




२. <u>सफरछंद</u> (लडाख- सायकलभ्रमंती)- ग्रंथाली प्रकाशन
(फ्लिपकार्टवर उपलब्ध) (ई-पुस्तक लवकरच उपलब्ध होईल)
https://www.flipkart.com/search?q=pankaj%20ghare&marketplace=FLIPKART&otracker=start&as-show=off&as=off

३. ब्लॉग:मनात आलं म्हणून
(https://pankajpghare.blogspot.com/)

प्रकाशचित्रण लिंक:
https://www.shutterstock.com/g/Pankaj+Ghare?rid=4558966&utm_medium=email&utm_source=ctrbreferral-link

४. दुर्ग साहित्य संमेलन- ४
सज्जनगड येथे परिसंवादात सहभाग
विषय: दुर्गसाहित्याच्या नव्या वाटा

५. 'लोकसत्ता'च्या 'ट्रेक-इट' सदरातील लेख
'भैरवगड'चे रंग, 'कलावंतीण' - २३०० फुटांची हंडी, 'आजोबां'च्या भेटीला, विराण 'वैराटगड', सहजसुंदर 'कोहोजगड', अक्षरगड (सुलेखनकला)

६. भारतीय नौदल मोटरबाईक रॅली आणि ट्रेकिंग मोहीम
(२३ मार्च ते २५ एप्रिल २०१६ )
मोहिमपूर्व व कॉफीटेबल पुस्तकासाठी मार्गदर्शन


७. 'किल्ला' विशेषांकातील लेख
माझा गडगडाट, जम्मू-काश्मिर आणि लडाखमधील किल्ले


८. ‘ई-साहित्य’ संकेतस्थळावर उपलब्ध पुस्तके:


(‘ट्रेकिंगिरी’ सदर- लेखन व प्रकाशचित्रण)

गोरखगड ते सिद्धगड, कधी ‘सरस’ सरस कधी ‘कळस’ कळस, ‘अलंगा’शी संग ‘मदना’शी गाठ, मुल्हेर ते साल्हेर



९. <u>एकांकिका (रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाच्या कायमस्वरूपी योग्यता प्रमाणपत्रासोबत)</u>

चौथा सिंह - (भारतीय सुरक्षेबद्दल)

भिंतीलाही टॅटू असतात - (किल्ल्यांवरील वर्तनाबद्दल)

नाव काढलं पोराने - (कारकीर्दबद्दल)

१०. <u>सकाळ ‘सप्तरंग’ मधील लेख</u>

‘सोंडाई’- रात्रीस खेळ चाले (Night Trek)

११. <u>दुर्गसखा- ई- मासिकातील लेख</u>

तप्त ‘रोहिड्या’वर

१२. <u>अक्षर प्रबोधन, ईशान्य वार्ता, विश्वभान या अंकांसाठी लेखन</u>

१३. <u>अप्रकाशित लेख</u>

वळणदार ‘लोहगड’. नाणे नसलेला ‘नाणेघाट’

<u>आवडतं वाचन:</u>

१. प्रेरणादायी व्यक्तिचरित्र

२. निसर्ग- माहिती / संवर्धन

३. ऐतिहासिक कादंबऱ्या (आणि लगेचच सत्यता पडताळणी)

**<u>जे वाचून वाचून मराठी भाषा आवडली</u>**

**<u>ते 'बालभारती'चं पुस्तक,</u>**

**<u>ठकठक, चंपक, चांदोबा, षटकार</u>**

**<u>या आणि अशा अनेक पाक्षिक / मासिकांना</u>**

**<u>समर्पित...</u>**

## मनात 'मनोगत' आलं म्हणून

'मनात आलं म्हणून....' या माझ्या ब्लॉगमधील https://pankajpghare.blogspot.com/ निवडक पोस्टचे संकलन करून हे छोटेखानी पुस्तक समोर आणत आहे.

यातील एखादा लेख तुम्हाला हसवेल.....

तर दूसरा ह्रदयाला स्पर्श करेल......

एक समाजातील एका विषयावर विचार करायला लावेल....

तर दूसरा एखादी आठवण जागवेल....

एक मराठीची समृद्धी दाखवेल.....

तर दूसरा मराठीच्या मुद्द्याला अधोरेखित करेल....

पुस्तकातील माझा सर्वात आवडता लेख मात्र फक्त आणि फक्त 'ई-साहित्य प्रतिष्ठान'च्या वाचकांसाठी http://www.esahity.com/ वर याच ई-पुस्तकात उपलब्ध आहे.

पुस्तकातील एक कथा ही माझ्या 'पहिले पाऊल' या प्रवासवर्णनातील एक शेवटचा भाग आहे.

'मनात आलं म्हणून' हे ई-पुस्तक तुम्हाला आवडेल आणि www.Bookganga.com या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले माझे 'पहिले पाऊल' हे ई-बुक तुम्ही 'Bookganga.com' या संकेतस्थळावर जरूर डाऊनलोड कराल याची मला खात्री आहे.

# अनुक्रमणिका


**बत्तीशी**

**ऊब 'माये'ची**

**अंड्यात जीव रंगला**

**बसमधली 'संगीतखुर्ची'**

**भाषेची भिंत**

**द्या धक्का आणि गाडी शिका**

**खाऊ**

**पहिला विमानप्रवास**

# बत्तीशी

बरेच अंक विशेषण म्हणून हमखास वापरले जातात. उदाहरण म्हणजे ३६ चा आकडा, १२ घरचे पाणी, ४ पावसाळे पाहिले, नव्याचे ९ दिवस, दुष्काळात १३ वा महिना, सतराशे साठ भानगडी, ४ दिवस सासूचे, सहावारी-नऊवारी साडी, असं बरंच काही. तसा '३२' हा आकडा खास हसण्याचे वर्णन म्हणून वापरतात. नीट तपासून पाहिल्यास एकूण मिळून ३० दात असतात; परंतू ३२ पूर्ण होण्यासाठी अक्कलदाढ येताना ज्या असह्य  वेदना होतात, त्या सोसताना अक्कलदाढेची आणि मुळात ३२ दात असण्याची गरज काय असा प्रश्न पडला.

मूळात दात हे अन्न चावण्यासाठी असतात, हसण्यासाठी असतात का जिभेला संरक्षण देण्यासाठी असतात हे लक्षात येत नाही. कारण लहान मूल, ज्याला दात नसतात तेही खूष असतं की! आणि ज्यांचे सर्व दात पडले आहेत अशांचं सुद्धा दातांशिवाय कुठे काय बिघडलंय?



याउलट, दात नसताना लहान मुलांचे गोड हसू पाहताना आपण आपले रंगीत दात उगाच दाखवू नयेत. हो, म्हणजे तसा दातांवर खर्च केला असेल तर काही हरकत नाही. तसा खर्च करण्याची वेळ आली, म्हणजे 'तो' भूर्दंड सोसण्याआधी दातांची काय अवस्था असेल ती कल्पना करवत नाही.... म्हणजे तंबाखू किंवा गुटख्याच्या व्यसनामुळे दात खराब झालेत असा गंभीर आरोप लागण्याची शक्यता असते. मग भले तुम्ही

लहान असताना चॉकलेट भरपूर खाता (हे खरे किंवा खोटे) कारण सांगत असाल तरी विश्वास ठेवणं कठीण.

दातांमुळे माणसाचा खर्च अनावश्यक खर्च वाढला हे मात्र निश्चित. टूथपेस्ट किंवा टूथपावडरचा खर्च आणि त्यामुळे नेमके होणारे फायदे कधीच लक्षात येत नाहीत. कडूनिंबाची काठी, मीठ किंवा तंबाखूचा वापर होत असताना कोणाला शहाणपण सुचलं आणि टूथपेस्ट, टूथब्रश, टूथपिक यांचा शोध लागला आणि पुढेपुढे म्हणजे आजपर्यंत अनेकविध चव असलेल्या, तोंडात कीटाणू असतातच याबद्दल उदंड आत्मविश्वास असणाऱ्या आणि तिथे पेस्ट कंट्रोल करणाऱ्या, तोंडाला श्वास किंवा ताजेपणा आणणाऱ्या, मुलीला पटवणाऱ्या उत्पादनांची निर्मिती झाली. चॉकलेटमुळे दात किडतात या वाक्यावर मात करत चुईंगगममुळे तोंडाचा व्यायाम होतो, दात चकाचक होतात इथपर्यंत ‘दंत’कथा बनल्या आहेत.

बरं, एखादवेळी ब्रशसाठीचा खर्च टाळता येऊ शकतो किंवा दातांसाठी वापरलेला ब्रश, हा नंतर केस काळे करण्यासाठी छोट्या मशिन स्वच्छ करण्यासाठी वापरता येऊ शकतो. पण महागडी टूथपेस्ट दातांना लावल्यावर ते थुंकायचं म्हणजे अगदी जीवावर येतं हो! रोज सकाळी खास थुंकण्यासाठी इतका खर्च करायचा. महागड्या टूथपेस्टवर खर्च करायचा आणि सूट मिळण्याची अपेक्षा करायची, हे एकदमच भिकारपणाचं वाटतं. नेलपॉलिश (मराठीत काहीच म्हणत नाहीत बहुतेक) प्रमाणे दातांसाठी एखादं बरेच दिवस टिकणारं पॉलिश असायला हवं होतं जे लावण्यासाठी सकाळी उठण्याची गरज नसेल.

तुम्ही जर दात घासले असतील किंवा तसा तुम्हाला अनुभव असेल तर एक गोष्ट तुमच्या लक्षात आली असेल. समोरच्या वरच्या चार दातांना आणि

खालच्या दोन दातांना पेस्ट जास्त लावली जाते. इतर सर्व दातांवर कमालीचा अन्यायच होतो. त्यामुळेच दाखवायचे दात आणि चावायचे दात असे वर्गीकरण होते आणि दातांमध्ये ‘फूट’ आणि मागच्या पेस्ट न लागलेल्या दातांमध्ये ‘फट’ पडते.

इतका सगळा खटाटोप करूनही लहानपणी दुधाचे दात पडतात आणि नवीन दात येतात. दूध पिल्यामुळे ऊर्जा मिळते इथवर माहिती होती. मग कमी किंवा जास्त दूध शरीरात गेले म्हणजे मूल श्रीमंताचं असो की गरिबाचं, एकूण मिळून येणाऱ्या दातांची संख्या सारखीच कशी असते हे एक न उलगडणारे कोडे आहे.

सांगायचं असं आहे की दात हा काही इतका महत्त्वाचा अवयव वाटत नाही. त्यामुळे ‘डेंटिस्ट’ला डॉक्टर म्हणावंसं वाटत नाही. म्हटलेच तरी त्याला कोणी देवाचे रूप मानत नाही. कारण दात पडला म्हणून जीव गेल्याचे ऐकिवात नाही. एखाद्या सेलिब्रिटीला आजार झाल्याची बातमी होते पण त्याचा किंवा त्याच्या अपत्याचा दात पडल्याची दखल पत्रकार घेत नाहीत.

पण थोडी दातांची बाजूही समजून घेणं महत्त्वाचं आहे. दातांमुळे बऱ्याच जणांना संबंधित उद्योग सुचले आणि सुरू झाले आणि अनेकांना रोजगार मिळाला. गाडी, विमानं त्यांचे इंजिन वापरून चालते, बंद झाल्यास धक्का मारून नेली जाते, तरीही काहीजण दातांनी ते ओढून दाखवतात. म्हणजे भविष्ययात पेट्रोलला पर्याय आहे तर. शिवाय कौशल्य, साहसाला चालना मिळते. आपलेही मनोरंजन होते कारण त्यावेळी आपले दात दुखत नाहीत.

प्रत्येक दात स्वतःच्या मुळाला आणि शेजारच्या दातांना नेहमी घट्ट धरून असतो. एकट्याने तो काहीच करू शकत नाही. दातांनी बऱ्याच जणांना दाते,


सुळे, दातार अशी आडनावे दिली. आमच्या इंजिनिअरिंगमधल्या गिअर्सना दातच असतात. फणी किंवा कंगव्यालाही दातच असतात.

तुझे दात तोडीन. दात घशात घालीन, काय दात दाखवतोस, दातखिळी बसली, दातओठ खाल्ले अशा काही नकारात्मक वाक्यांचे योगदान दातांनी मराठीला दिले.

हे खरं असलं तरीही दातांच्या वाट्याला उपेक्षाच आली आहे. एखाद्याच्या हसण्याचे वर्णन चांगलं करायचं असेल तर ‘गालातल्या गालात’ असं केलं जातं आणि गालांना श्रेय मिळतं. मी मनापासून हसलो किंवा पोट धरून हसलो असं ऐकायला मिळेल पण मी दातांपासून हसलो किंवा दात धरून हसलो असं ऐकायला मिळत नाही.

दात या विषयावर इतकं लिहिण्यामागे सकाळी सकाळी उठून आधी दात घासावे लागतात. त्यामुळे सगळा राग दातांवर निघतो. हे नीट घासून झालेत की नाही हे कळेपर्यंत आई ओरडायला सुरुवात करते... आणि दात घासता घासता सुचलेले विचार कागदावर उतरवायचे किंवा ‘कोरायचे’ राहून जातात.

पुढच्या वेळेपासून फोटो काढताना ‘स्माईल प्लीज’ ऐवजी म्हणा ....’बत्तीशी’!



# <u>ऊब 'माये'ची</u>

सहावीची शालांत परीक्षा संपून मे महिन्याची सुट्टी होती. वेंगुर्ला तालुक्यात तुळसगावी आजी-आजोबांसोबत आम्ही सर्व नातवंडं जमा व्हायचो. पेज जेवून क्रिकेट खेळणं, विहिरीजवळ अंघोळ करणं, आजोबांची घोडा सायकल आळीपाळीने चालवणं, काहीच न करणं आणि मुंबईला येताना हमखास एक जखम आणणं हेच उद्योग होते.

आजीच्या आईला पणजी म्हणतात <u>आणि</u> काहीजणांची पणजी जिवंत असते तशी आमची पणजी जिवंत असल्याचा आनंद होता. तिच्या घरी, आसोली गावी जाणं ठरलेलं असायचं. एक सुमो गाडी भाड्याने घेऊन घरातल्या सर्व सुनांना माहेरी जाण्याची आजीची 'परवानगी ' सुनांना मान्य होती.

त्या वर्षी पणजीच्या घरात एका कुत्रीने अगदी दोन दिवस आ<u>धी</u> सात-आठ पिलांना जन्म दिला होता. दोन पिलं जगलीच नाही. उरलेल्या पिलांपैकी दोन पिल्लं खूप आवडली. तिथून पुढच्या गावी निघण्यासाठी मन तयार नव्हतं. भावा-बहिणींना मस्का, आजी आजोबांना विनंती आणि आई-पप्पांकडे हट्ट <u>करून</u> गडद पिवळ्या रंगाचं पिल्लू मी तुळस गावी नेण्यासाठी सोबत घेतलं.



त्याची आई कुठेतरी फिरायला गेली असावी. 'रेडी गावच्या गणपती मंदिरात जाण्याआधी पिलाची काळजी घेणार ना याची ड्रायव्हरकडून खात्री करून घेतली. गाडीत उतरताना त्याने सीट ओली केली होती आणि लहान

बाळाबद्दल सांगतात तसं मी त्या सीटला हात लावून सर्वांना सांगितलं. भाई आणि ताईने काय हा विचित्रपणा असं म्हणत एकमेकांकडे पाहिलं तेंव्हा मी गुंतलोय हे मला कळलं.

त्याला घरी आणलं तेंव्हा कोणाला आवडलं असेल, कोणाला नाही. बशीतून दूध, बिस्किटं, चपाती वगैरे देऊन त्याचे लाड करायला सुरुवात झाली. तिसरीत पाहिलेल्या जंगलबुकचा प्रभाव टिकून होता. शेरखानवरून त्याचं नाव 'शेरु' असं ठरलं. त्याला खेळायला, चेंडू आणायला, मागच्या पायावर उभं रहायला शिकवायचं ठरवलं आणि समाधानाने सगळे झोपलो. (माणसाची भाषा प्राण्याला समजत असेल आणि त्यामुळे माणसाचं काम होत असेल तर त्या प्राण्याला हुशार हे विशेषण मिळतं.)

पण मध्यरात्री ते पिल्लू जागं झालं आणि वेगळया आवाजात ओरडू लागलं. मी आणि बरेच जण जागे झालो तर काहींची झोपमोड झाली. माझी आई म्हणाली, शेरू रडतोय आणि तो त्याच्या आईला शोधतोय. केलेल्या कृत्याचं आता वाईट वाटायला लागलं. त्याचा आवाजसुद्धा केविलवाणा होता. तो झोपल्याशिवाय कोणाला झोपही मिळणार नव्हती. मग माझ्या आईने त्याच्या पोटावर हात ठेवला. बराच वेळ हात तसाच ठेवला तेंव्हा तो झोपला. आई म्हणाली, शेरूची आई झोपताना सगळ्या पिलांना पोटाजवळ ठेवून झोपत असणार तेंव्हा तिचा पाय त्याच्या अंगावर कुठेतरी असेल. त्याची शेरूला सवय असेल आणि या वेळेला ती सुद्धा अशीच रडत असेल नाहीतर त्याला शोधत असेल. त्याला त्याच्या आईकडे दिलं की तो नाही रडणार, आईने समजावलं. इतकं ऐकून मी पुढे काहीच न बोलता गुपचूप झोपलो. शेरू शांत झाला आणि आई-पप्पा झोपायला गेले.

पुन्हा थोड्या वेळाने शेरू रडत उठला. आता तर खरंच मला तो आईसाठी रडतोय वाटलं. मी नाही उठलो. कारण सगळी चूक माझीच होती. माझी आई उठली आणि पुन्हा त्याच्या पोटावर हात ठेवला तसा तो शांत झाला.
सकाळी मला जाग आली तेंव्हा शेरू आधीच दुडदुडत होता. मी दात घासत अंगणापलीकडे चालत गेलो तर माझ्या पायाकडेच घुटमळत होता. इतक्यात त्याला कळलं होतं की त्याच्यावर सर्वात जास्त जीव कोणाचा आहे. पण आम्ही ठरवलं होतं की त्याला त्याच्या आईकडे आसोलीला सोडायचं. मी आणि फक्त पप्पा बसने निघालो. येताना फक्त त्याला आणलं होतं, जाताना एका मऊ कपड्यात गुंडाळलं. तुळस ते वेंगुर्ला प्रवासाची तिकीट काढावी लागली नाही. पण वेंगुर्लापासून आसोलीला जाताना कंडक्टरने हा चावणार नाही ना विचारलं आणि ३ रुपयांची तिकीट काढली तेंव्हा राग आला. बस आसोलीला पोहोचेपर्यंत तो माझ्याच मांडीवर होता.

बसमधून उतरल्यावर रिक्षावाल्या काकांना पप्पांनी 'धुरींचं घर' इतकंच म्हटलं तसा तो निघाला. ज्याची जास्त काळजी तो मध्ये बसणार या नियमाने ' शेरू' ला आमच्या दोघांच्या मधली जागा दिली. अगदी थोड्या वेळात कुणी आमच्या रिक्षामागून धावतंय असं लक्षात आलं. साहजिकच वेगामुळे आम्ही पुढे गेलो. आणि पणजीच्या घरी 'शेरू'ला ठेवलं. धापा टाकत त्याची आई पणजीच्या अंगणात पोहोचली आणि शेरूला चाटू लागली. आजीने (पप्पांच्या मामीने) चहा सोबत दिलेल्या आंबोळ्यांचे छोटे तुकडे करत मी, शेरू नि त्याच्या आईकडे फेकले. आजी म्हणाली तू तरी खा.

आणि मी अक्षरशः रडायला लागलो. (ही पूर्ण आठवण लिहताना सुद्धा कंठ पुनःपुन्हा दाटला आणि दुखू लागला) मी पप्पांना मिठी मारली. त्यावेळी तेच माझी आई होतें. बराच वेळ रडण्यातही गेला. आजी आजोबा काहीच बोलत

नव्हते. रडतरडत शेरूला मिठी मारली नि आसोली सोडलं. नंतर पुन्हा रडलो नाही. बसमध्ये पप्पांच्या मांडीवर झोपून होतो. काहीच वाईट झालं नाही असं म्हणत तो दिवस गेला. त्या रात्री मी झोपेत शेरू-शेरू बडबडत होतो. मोठी काकी (ताईची आई) माझ्या आईला म्हणाली, त्याला ताप तर नाही ना आला. मध्यरात्री उठून आईने माझ्या डोक्यावर हात फिरवत ' बरा आहेस ना' विचारलं. कुठेच न पडता त्यावर्षी ही एक जखम आणली. ताप आला नव्हता. आईसुद्धा शांत झोपली.

तिकडे शेरूसुद्धा त्याच्या आईशेजारी शांत झोपला असेल आणि त्याची आईसुद्धा शांत झोपली असेल हे त्या वेळी समजलं.

पुन्हा कधीच पिल्लू घेऊन घरी आलो नाही. पण मुंबईला येऊन त्याचं चित्र काढून रंगवलं. आईला दाखवलं.
आई म्हणाली, कान तसेच काढलेस. खाली पडलेले.



त्या दिवशी मला 'आई' कळली.
हाच काय तो आनंद.

# <u>अंड्यात जीव रंगला</u>

फ्रिजमध्ये सर्वात वरचं म्हणजे मानाचं स्थान असतं बर्फाला. बंद करताना लक्षात आलं की तेच मानाचं स्थान उजव्या बाजूला अंड्यांना मिळालंय. दिमाखात नि शिस्तीत उभी अंडी नजरेत भरली.

बाहेरून कडक आणि आतून गोड असलेल्या व्यक्तीला नारळाची उपमा देतात; पण तो गोडपणा देण्याआधी नारळ खूप भाव खातो ('ॲटिट्यूड' दाखवतो). पण अंडं कसं? फोडलं नि खाल्लं. हो हो. कच्चंसुद्धा. आगीचा उपयोग करायच्या आधी माणूस सगळं कच्चंच खायचा ना? 'भाग मिल्खा भाग' चित्रपटात मी फरहानला कच्चं अंडं दुधात मिसळून खाताना पाहिलं. (मिल्खासिंग माझ्या फार आधी जन्माला आले होते. त्यांना नाही पाहिलं) .

जगातली सर्वात सोपी पाककृती...एक साधं अंडं नुसतं उकडायचं. <u>तसा</u> तर बटाटा पण उकडता येतो. पण अंड्याची साल किती सहज निघते! फक्त रवी घुसळल्यासारखं केलं की कवच निघून स्पर्श न झालेला पदार्थ समोर. (त्यामुळे वातावरणाशी संपर्क न झालेला दुसरा मानाचा पदार्थ म्हणजे इडली). मग त्यातला पिवळा बलक नेमका कुठे हे कुतुहलाने शोधायचं. (चमच्याने शक्य असले तरी) त्याचे चाकूने दोन भाग करायचे. त्या सपाट भागावर मीठमसाला कांदा फिरवून खाल्ला तरी पावासोबत खाल्ला तरी आणि नुसताच खाल्ला तरी चालेल; पण नुसता बटाटा काही पावात ठेवून खाता येत नाही. पावाशी युती होण्यासाठी बटाटावडा हे रूप मिळेपर्यंत त्याला बरेच प्रयत्न करावे लागतात. उकडलेलं अंडं कशातही पडलं तरी ते विरघळत नाही. बिस्कीट-खारीसारखं जास्त वेळ भिजलं की अंड्यांची अस्तित्वाची लढाई संपत नाही.



अंड्यांपासून केलेला जगभर माहीत असलेला तेल वापरून केलेला पदार्थ म्हणजे आम्लेट. कपात मिठासोबत फेटून किंवा थेट तव्यावर आतला द्रव पसरवून आम्लेट तयार.  अशी तर चपाती सुद्धा नाही बनत.  शिवाय ती गोल असावी अशी जागतिक अपेक्षासुद्धा आम्लेट बनवणाऱ्याकडून नसते. डिस्कव्हरी वाहिनीवर पाहिलं होतं की अंडी फोडून आतील कवचावर पाण्यात बुडवलेलं बोट फिरवलं की सगळा द्रव पूर्णपणे बाहेर येतो. (परदेशी लोकांनी सांगितलं की वेगाने खरं वाटतं ना).

आम्लेट बनवताना कुणी मसाला, कांदा, लसूण, कडीपत्ता, कोथिंबीर त्यावर पसरवली; पण कदाचित सवयीप्रमाणे त्याने ढवळाढवळ केली असावी आणि त्यातून बुर्जीचा शोध लागला असावा. मोठमोठे शोध असेच लागतात. अंघोळ करताना, डोक्यावर सफरचंद पडल्यावर, गायीचं दूध काढताना, वगैरे वगैरे. बुर्जीमध्ये दोन प्रकार जुळ्या बहिणीसारखे आहेत. एकीला हळद लावलेली आवडते तर दुसरीला लाल मसाला. बुर्जी बनवणंसुद्धा किचकट काम नसलं तरी अंडं फोडल्यानंतर ते वेगाने मिसळावं लागतं. नाहीतर भजीच्या आकाराचे गोळे बनतात. अंड्यातील द्रवाचे कण जितके जास्त वेगळे होतील तितका बुर्जी बनवणारा स्वयंपाकघरात जास्त वेळ घालवलेला समजावा.

अंड्यांचं सार किंवा अंडाकढी ही आधी सांगितलेल्या पदार्थांच्या वरच्या दर्जातल्या जेवण बनवणाऱ्यांसाठी आहे. इतर आमट्या किंवा कढी बनवणाऱ्यांना हा मसालेदार पदार्थ बनवता येणं शक्य आहे. या सारात अंडं फोडून टाकलं तर, (घराला घरपण येतं तसं) पूर्ण कढीला 'अंडंपण' येतं. उकडलेलं अंडं

कापून सपाट अर्धा भाग वर राहील अशी रचून ठेवल्यास पिवळ्या बलकामुळे पदार्थात एक नैसर्गिक रांगोळी दिसते.

अंडाबिर्याणी हा प्रकार तसा हॉटेलवाल्यांनी आम्हाला बरंच काही बनवता येतं हे सांगत बराच सुकाभात देऊन गि-हाईक' बनवण्यासाठी केलेला पदार्थ आहे. अंडाकढी भातात कालवली तरी अंडाबिर्याणी (माझ्याकडून) बनते. उकडलेलं अंडं उकडलेल्या भातात ठेवलं तरी ते एकजीव होत नाहीत. जिरं जसं भातात जिरतं तसं अंडं भातात अंडलं किंवा जिरलं असं कधी झालं नाही.

अंड्यांचा वापर करून बनवलेला सर्वात लोकप्रिय पदार्थ म्हणजे केक. अहाहा. (देव कसा, असतो पण दिसत नाही तसंच,) अंडं हे केकमध्ये असतं पण दिसत नाही. (देव आहे की नाही आणि केकमध्ये अंडं आहे की नाही याची चर्चा होत असते.)

अंडं हा एकच पदार्थ आहे जो पाव, चपाती, भाकरी, पराठामध्ये, भात या कुणासोबतही आणि कोणासोबत न जाता स्वतंत्र पक्ष काढून नुसतासुद्धा खाता येतो. तो नूडल्ससोबत आणि नूडल्स बनवताना त्यात बुर्जीप्रमाणे बनवता येतो. ते स्वाभिमानीसुद्धा आहे आणि मिळून-मिसळूनही राहतं!

उत्तरपत्रिकेत कधी शून्य मिळाले तर भोपळा मिळाला असं म्हणतात पण भोपळ्याच्या आकाराचा शून्य मी पाहिला नाही. जगाची निर्मिती शून्यातून झाली आहे. अंडयांतूनसुद्धा नवीन जीव जन्माला येतो. भोपळ्यातून येतो का? नाही. खूप वेळ बसून असलेल्या व्यक्तीलासुद्धा 'इतका वेळ अंडी उबवत होतास का?' असं आपलेपणाने विचारलं जातं.

बसमध्ये बसून बसून मीसुद्धा हेच केलं.

# बसमधली 'संगीतखुर्ची'

मुंबईतली बेस्टची रिकामी बस पहिल्या स्थानकाजवळ आली. रांगेत असलेले सर्वच एकेक करत बसमध्ये चढले. वयस्कर गृहस्थ ज्येष्ठांच्या जागी पुढून चढत बसले. रांगेत असलेल्या महिला त्यांच्या राखीव जागी उजव्या बाजूला बसल्या. पुरूषमंडळी महिलांच्या जागी न बसता इतर जागी बसले. काही जोडपी वेगवेगळे बसले. एक जोडपं डाव्या बाजूला बसलं. मागे एक महाविद्यालयीन मुलगा-मुलगी एकत्र डाव्या बाजूला बसले आणि अभ्यासाबद्दल बोलू लागले.

अपंगांची एक, महिलांच्या दोन आणि ज्येष्ठांची एक अशा राखीव जागा रिकाम्या राहिल्या. बस सुरू. पुढच्या स्थानकाला दोन पुरूष बसमध्ये शिरले. एकाने जोडप्यांपैकी महिलेला, महिलांच्या राखीव जागी बसण्याची विनंती केली. त्याप्रमाणे तिने जागा बदलली. मुलासोबत बसलेल्या मुलीला दुसऱ्या पुरूषाने महिलेच्या जागी बसण्यास सांगितले. दुसरी कोणतीच जागा रिकामी नसल्याची खात्री करून मुलगी राखीव जागी बसली. पूर्ण बस भरली.



पुढच्या स्थानकात दोन अपंग, सात महिला, चार ज्येष्ठ चढले. अपंगांपैकी जो पहिला बसमध्ये शिरला तो त्याच्या जागी बसला. त्यांना बसमध्ये शिरायला वेळ लागतोय हे पाहून चार ज्येष्ठांपैकी एक मागच्या दरवाजाने चढून धावत त्याच्या राखीव जागी बसला. संगीतखुर्चीप्रमाणे सातपैकी जी महिला पहिली आली ती

महिलांच्या जागी बसली. संगीतखुर्चीचा हा खेळ पाहून सर्वजण हलकेच हसले. एक अपंग, सहा महिला नि तीन ज्येष्ठ जागा मिळण्याची वाट पाहत उभे राहिले.

इथून पुढे प्रत्येक स्थानकावर जर महिलेची खुर्ची रिकामी झाली तरच उभ्या असलेल्या महिलेला बसायला मिळालं. पुरूषांच्या बाजूला बसण्यास कुणी तयार नव्हतं. त्यामुळे एखादा पुरूष जागा सोडून गेला की उभ्या असलेल्या पुरूषास सहज जागा मिळाली. चाळीसपैकी कोणीही उठून गेलं की पुरूषाला आणि बारापैकी कोणी उठून गेलं तरच महिलेला जागा मिळे.

मग राखीव म्हणजे नेमकं काय? आरक्षण म्हणजे काय? आरक्षण म्हणजे जास्तीत जास्त पण मिळतंय कमीत कमी. म्हणजे अगदी उलट. कमीत कमी बारा महिलांना बसमध्ये बसायला मिळणं अपेक्षित होतं; पण वरील घटनेत जास्तीत जास्त बारा जणांना जागा मिळाली.



इतर जागी 'पुरूषांसाठी' असं लिहिलेलं असतं का? नाही. त्या जागा सर्वांसाठी असतात. महिला, अपंग, ज्येष्ठ कोणत्याही जागी बसू शकतात. त्यांनी इच्छा असेल तिथे बसल्यास जास्तीत जास्त महिलांना बसायला मिळेल.

इथे खरंतर त्या महिलांची चूक जास्त ज्यांनी आधी आरक्षित जागा भरून टाकल्या. नंतर त्या महिलांची चूक ज्यांनी सर्वांसाठी असलेल्या जागा सोडून दिल्या. अपंग आणि ज्येष्ठंचंही तेच.

संगीतखुर्चीचे बेस्टमधले नियम स्पष्ट आहेत?

# भाषेची भिंत

काही दिवस चेन्नईला होतो. तिथला अनुभव.....

तिथे जाण्याची ही पहिलीच वेळ. तिथल्या लोकांना हिंदी येत नाही असं ऐकून होतो त्यामुळे इंग्रजी बोलावं लागेल हे स्पष्ट होतं. पण ते केवळ कामापुरता. कुणालाही / सरकारी कामगारालाही काही हिंदी किंवा इंग्रजीमध्ये विचारलं तर आधी तमिळमध्ये उत्तर मिळायचं, नंतर तुटक इंग्रजीमध्ये. तुमचा इन्चार्ज कुठे आहे असं विचारलं तर "नो इन्चार्ज only तमिल" असे चमत्कारिक उत्तर मिळाले. तामिळ येत नाही असं सांगितल्यावर तर काहीच मदत मिळायची नाही.


कोणतंही काम करताना पुन्हा पुन्हा भाषेची अडचण यायची; तर कायमस्वरूपी नोकरी करण्याचा विचार तर दूरच राहिला. त्यांनी एक मजबूत भिंत बनवली आहे....भाषेची. साधी साधी कामे करताना वैताग येतो. ते खूप छान इडली, डोसा, मेदुवडा, डाळ वडा, म्हैसूरपाक, रसम, कॉफी बनवतात. भात उत्कृष्ट गुणवत्तेचा असतो पण त्यांना चपाती नीट बनवता येत नाही असं वाटायचं. काही हॉटेलात तर स्पेशल थाळी मध्येच चपाती मिळाली. जसे त्यांचे पदार्थ मुंबईत जितक्या सहज मिळतात तितक्या सहज वडापाव, कांदेपोहे, ढोकळा, इतर राज्यातले पदार्थ तिथे दिसले नाहीत. जेवणाची ऑर्डर देताना समजावून सांगावं लागतं.

एका म्युझियममध्ये गांधीजी हे एकच ओळखीचे स्वातंत्र्यसैनिक होते. बाकी सर्व दक्षिणेतीलच होते. हा गैरसमज नाही. गैरसमज असेल तर तो बाहेर लावलेल्या तमिळ भाषेतील फलकांमुळेच कारण तेच फलक इंग्रजी भाषेत

नाहीत. भारत विरुद्ध न्यूझीलंडच्या सामन्याचं समालोचन तिथे वेगळ्या वाहिनीवर तमिळ भाषेत होतं. आमिर खानचा 'सीक्रेट सुपरस्टार' किंवा अजय देवगणचा 'गोलमाल' यापैकी कोणत्याही चित्रपटाची जाहिरात मी पाहिली नाही. सरकारी ऑफिसात हिंदी शब्द परिचय व्हावा म्हणून बोर्डवर एक हिंदी शब्द लिहिलेला असायचा. आठवडाभर एकच शब्द होता......'जागरूक'. तिथे ओला टॅक्सी बोलवली तर आधी त्यांना नीट समजावून सांगावं लागायचं, नाहीतर शेजारी कोणी इंग्रजी समजणारा सापडला तर त्याला तामिळमध्ये टॅक्सीचालकाशी बोलायला सांगावं लागलं. तिथे बरीच तमिळ आणि इंग्रजी वर्तमानपत्रे आहेत एखादं हिंदी वर्तमानपत्र आहे. मुंबईत जशी सर्व भाषेच्या वर्तमानपत्रांची दुकानं दिसतात तशी इतर कुठे दिसतात? ओला टॅक्सी मध्ये गाणी ऐकावीशी वाटली तर रेडिओवर 6 वाहिन्या या तामिळ भाषेतल्या गाण्यांसाठी होत्या. हिंदी गाणे चालू असलेली वाहिनी मिळाली नाही.

हे असे बोलतात की जणू समोरच्याला तमिळ व्यवस्थित येतं. कोणत्याही दुसरा भाषिकांशी न भांडता त्यांनी स्वतःच्या राज्यात स्वतःची संस्कृती, स्वतःची नोकरी व्यवस्थित सांभाळली आहे आणि व्यवसाय करायचा असेल तर ते मुंबई /दुबई/ सिंगापूर अशी ठिकाणे निवडतात. शहरात आलेल्या अशा लोकांना पाहून आपल्याला असं वाटतं की हे खूप प्रगत आहेत आणि त्यांच्या प्रगतीचं कारण इंग्रजी भाषा आहे पण प्रत्यक्षात स्थिती वेगळी आहे. उदाहरण म्हणजे आजही तिथे भविष्य सांगण्यासाठी पोपट बाहेर येतात. रस्त्याच्या किनारी उघडपणे दारू विकली जाते आणि त्यासाठी रांगा लागतात!! विषयांतर नको.

त्यांची भाषा सोडून इतर भाषीय त्यांना आपलेसे नाही वाटत आणि हे त्यांच्या बोलण्यातून; म्हणजे न बोलण्यामुळे जाणवलं.



मराठी माणसाचं काय चुकतं? तो तमिळ माणसासारखा वागला तर मात्र तो संकुचित विचारांचा आहे असा ठपका लागतो? आपल्याकडे मराठी भाषेचा मुद्दा आहे हेच दुःख आहे आणि एखाद्या पक्षाचा तो मुद्दा आहे सर्व मराठी भाषिकांचा नाही हे मोठं दुःखं आहे. आधी मराठी माणसालाच समजवावं लागतं. आपण मराठी माणसंच चांगली, भोळी की मूर्ख आहोत हे कळत नाही पण आपण पाहूणचार तमिळ लोकांसारखा करावा म्हणजे पाहुणचार करूच नये (असं वागावं की कुणाशी भांडणही होणार नाही आणि आपण कुणाला आवडणारही नाही) आणि हा उपाय तमिळनाडूमध्ये जाऊन मिळाला. एक वेगळ्या प्रकारचं असहकार आंदोलन आपोआपच अनुभवायला मिळालं. त्यांच्यावर टीका करण्याचा हेतू असता तर इंग्रजीत लिहिला असता पण काहीतरी शिकण्याची गरज मराठी माणसाला आहे. काही सुधारता आलं तर स्वतःपासून सुरूवात करू.

# द्या धक्का आणि गाडी शिका

वर्ष २००६.

दुचाकीचा परवाना काढतोसच आहेस तर चारचाकीचासुद्धा काढून घे असं कुणीतरी दीडशहाणपणा सुचवला. शिवाय पुढेमागे (म्हणजे खूपच पुढे) तू कधीतरी चारचाकी घेशील असं माझ्यापेक्षा त्याला जास्त वाटत होतं. पुस्तकी शिक्षण न घेता, उपयोगी येईल असं काहीतरी शिकायला मिळणार म्हणून ड्रायव्हिंग शिकण्याचं ठरलं.

शनिवारी दुपारी ऑफिसमधून निघालो. ड्रायव्हिंगचा पहिला दिवस. अगदी उत्साहात अगदी वेळेवर चार वाजता पोहोचलो. पैसे भरले. फॉर्म भरून घेणाऱ्याला क्लास नेमका कधी सुरू होईल विचारलं. तो म्हणाला, " आजच". मी खूष!!!!

दुकानाच्या दारासमोर वाईट अवस्थेतली गाडी बघून मी पैसे घेणाऱ्या मालकाकडे पाहिलं. "काही नाही, आजचा एकच दिवस ही गाडी वापरा "असं तो समजावत (हसत) म्हणाला. गाडीची अवस्था आतूनही वाईट होती. मालक येण्याची वाट पाहत त्या गरमागरम गाडीत मी ड्रायव्हरच्या जागेशेजारी बसलो. थोड्या वेळाने एक माणूस मध्यरात्रीच्या झोपेतून उठल्यासारखा गाडीजवळ आला. मळलेला शर्ट, विस्कटलेले केस, मोठे बटबटीत डोळे, पान खाल्लेलं तोंड, तोंडात जपून ठेवलेला तंबाखू, वैतागलेला चेहरा, पायात रबरी चप्पल (नाही. रबरी चप्पलमध्ये पाय), सैल कपडे असा त्याचा अवतार. तो ड्रायव्हरच्या जागी बसला तेंव्हा कुठे लक्षात आलं की हा माझा चारचाकीचा गुरू.

शिवाजी तलावपासून जिजामाता विद्यामंदिरपर्यंत ती मारूती गाडी त्याने व्यवस्थित चालवली. 'गाडी डोंगी परि इंजिन नोहे डोंगे, काय भुललासी वरलिया रंगे' असा संतविचार येऊन मी स्वत:ची समजूत घातली. पुढच्याच क्षणी गाडीतलं पेट्रोल संपलं असं गुरूंनी सांगितलं. "बाळ, जरा मंगतराम पेट्रोलपंपला जाऊन पेट्रोल आणशील?" विचारत त्याने पैसे आणि बाटली हातात दिली. शिकायचा पहिला दिवस वाया जाऊ नये म्हणत मीही तयार झालो. त्या काळात पेट्रोल ४५ रूपये होतं. पहिल्यांदा पेट्रोल, त्याचा रंग, सुगंध, पंप कुतूहलाने पाहिलं. बाटली भरुन पुन्हा गाडीकडे येईपर्यंत अर्धा तास गेला असेल. तेंव्हा तो जुन्या नोकीया मोबाईलवर कुणाला तरी सांगत होता,"हा-हा, मी एका पोऱ्याला पेट्रोल आणायला पाठवलंय". मी बाटली त्याला देऊन गाडीत बसलो. शिकवण्यासाठी एखाद्या मोकळ्या जागी जायचं असेल असा माझा अंदाज होता. पण दोन महिला गाडीजवळ आल्या. तेंव्हा "बाबू, आपण उद्या सुरू करू" म्हणाला, तेंव्हा अखेर बाबू हताश होऊन घरी आला.

'न कर्त्याचा वार शनिवार' म्हणत विषय सोडून दिला. माझी शिकण्याची खरंतर वेळ सकाळची होती आणि मालकाने वेगळ्या गाडीबद्दल सांगितलं होतं. सोमवारपासून आपण नक्की शिकू आणि चांगली गाडी वापरून चांगलं शिकू असं स्वतःला समजावलं. सोमवारी लवकर उठून साडेसहाला पोहोचलो तर तीच गाडी तोच ड्रायव्हर!? यावेळी गाडी काही केल्या सुरूसुद्धा होईना. तिलाच दोघं ढकलत ढकलत शिवाजी तलावाशेजारी असलेला ४५ अंश चढ चढून दुकानापर्यंत आलो. दुकानमालक तर नव्हताच. चांगली गाडी न देता ही खटारा वाट्याला आली होती. मी आयुष्यात पहिल्यांदा खऱ्या गाडीच्या ड्राइवरच्या जागी गाडी चालवण्यासाठी बसलो. विमानाचा पायलट झाल्यासारखं वाटलं. माझा गुरू हाच माझा पहिला 'को-पायलट' होता. त्यानेच चावी दिली आणि गाडी सुरू झाली. त्याने एक हात

स्टेअरिंगवर ठेवला आणि योग्य ठिकाणी वळण देऊ लागला. मी त्याला प्रश्न विचारला तर चिडेल असा त्याचा सततचा चिडका चेहरा बघून वाटायचं. क्लच, ब्रेक, ॲक्सिलेटरबद्दल मला माहीत असूनही त्याने काहीतरी बोलावं म्हणून विचारलं. (इंजिनीअरींग शिकताना बऱ्याचदा वाचूनही त्याची फक्त स्पेलिंग पाठ झाली होती.)

तीन दिवस त्याच्या अंगात विक्रम गोखले शिरले होते. तो फार वेळाने कमी शब्द असलेलं एखादं वाक्य बोलायचा. खरंतर त्याला बोलता येतं याची आठवण मला तेंव्हाच यायची. तीन दिवस काही शिकलो असं वाटलंच नाही. शिकवणाऱ्याच्या पायाकडे सुद्धा क्लच-ब्रेक असतात हे काही इंजिनीअरींगमध्ये शिकवलं नव्हतं. इतकी फी भरून.... दगा झाला राजे.... दगा झाला.

रोज लवकर उठून पहिला पोहोचलो तर गाडी चढावावर ढकलत न्यावी लागते म्हणून नाइलाजाने एकदा उशिरा उठून उशिरा हजर झालो तेंव्हा एक गणिताचे सर ड्रायव्हिंग शिकायला स्वत:ची बॅच बदलून माझ्या बॅचला सामील झाले. मागे बसून त्यांना मी माझी समस्या सांगितली की सर हा ड्राइवर शिकवण्यासाठीचं काहीच बोलत नाही. गणिताच्या सरांनी नवा मंत्र दिला,"त्याच्या हातावर शंभर रूपये टेकव. मग बघ कसा पोपटासारखा बोलतो तो. मी पण हेच केलं." त्यावेळच्या



पगारानुसार शंभर रूपये तर जड झाले पण तेच १०० रूपये २००० रुपये वसूल करणार होते.

पण आत्ता कुठे खरं शिक्षण सुरू झालं. तीन-चार दिवसात आत्मविश्वास असा आला की त्याला थेट म्हटलं, तुम्ही त्या क्लचवर पाय नका ठेऊ. काही दिवसांनी सकाळी सकाळी गाडी ढकलावी लागेल म्हणून मी आणि सर लपून रहायचो. खूप वेळ गेला की तो शोध नाही म्हटल्यावर पुन्हा गाडी ढकलायला जायचो.

शेवटचा दिवस. त्याच गाडीतून वडाळा इथल्या RTO ऑफिसपर्यंत त्यानेच गाडी चालवली. दोन तास वाट पाहिल्यानंतर तिथला अधिकारी आला. त्याच्यासमोर गाडी चालवायला सुरूवात करून रस्त्याच्या टोकाला गाडी वळवून पुन्हा मागे आलात की तुम्ही पास झालात. इतकी सोपी परीक्षा! मला तर बंद पडलेली गाडी चढावावर ढकलत चालू करेन इतकं खडतर प्रशिक्षण मिळालेलं. दुचाकीसाठी आठचा आकडा काढावा लागला नाही. तिथे दिलेल्या चारचाकीला फक्त ड्राइवरच्या जागेकडे क्लच असताना, हासुद्धा माझ्यासारख्या प्रत्येक शिकाऊ ड्राइवरच्या शेजारी का बसायचा हा प्रश्न पडला. परवाना (लायसन्स) मिळणारच आहे या आनंदात गाडी चालवायला सुरूवात केली. गाडी चालवताना (बोलायलाही जमू लागलं म्हणून) त्याच्याशी शेवटचं बोललो, "झालं ना सगळं?" अगदी सरळ जाऊन टोकाला पोहोचलो आणि गाडी वळवणार तेंव्हा तो पुन्हा म्हणाला,

" शंभर रूपये काढ. "

# खाऊ

माणसाने शाकाहारी व्हावं की मांसाहारी हा ज्याचा त्याचा वैयक्तिक, कौटुंबिक किंवा धार्मिक प्रश्न आहे. बऱ्याचदा हे शेजाऱ्यांवरसुद्‌धा अवलंबून असतं. शेजारी जर कट्टर अमांसाहारी असेल तर स्वतःच्या मांसाहारावर ताण पडतो आणि जर तो हौशी मांसाहारी असेल तर पदार्थ स्वतःच्या घरी बनवावे लागतं नाहीत. पाने, फळे हे जर वनस्पतींचे अवयव असतील आणि वनस्पती हे सजीव गटातले असतील तर भाज्या, फळे खाणाऱ्यांना मांसाहारी का म्हणू नये हा प्रश्न मी बऱ्याच अमासेहारी आणि अकोंबडीहारी मित्रांना विचारत आलोय. खरंतर छळलंय मी त्यांना. आणि रिकामे मन नाही, रिकामे पोट हे सैतानाचे घर असते. सर्व सजीव काही ना काही खातात तर कधी त्यांना उपाशी राहावं लागतं. पण माणूस हा एकमेव प्राणी असेल की जो जाणूनबुजून उपवास धरतो.... कारण कोणतेही असो.

अशीच उपाशी रहायची वेळ कधी चुकून येते. आई घरात नसताना, वडील कामात व्यग्र असताना किंवा बाहेर असताना, भाऊ- बहिण तेंव्हाच पार्टीला गेले असताना, शेजाऱ्यांकडे मागण्याची लाज वाटताना आणि नेमके त्याच दिवशी जवळचे हॉटेल बंद असताना कोणतेही कारण नसताना उपोषणाला बसल्यासारखे वाटते आणि खाऊचे डबे आपण शोधू लागतो. काहीही सापडत नाही आणि उपवास जाहीर करावा लागतो.

आणि आपलंच घर आपल्याला खायला उठतं.....

घर खायला उठतं? कसं काय शक्य आहे? घर का आपल्याला खाईल असा विचार मनात आला... आणि लांबलचक यादी तयार झाली. थेट बालपणात शिरलो जिथे जायला जास्त वेळ लागतं नाही.

आई-वडिलांचा मार खाल्ल्याशिवाय बालपण गेले असेल तर बालपण अपुरे आहे किंवा तो खाऊ 'किती महत्वाचा आहे हे मोठे झाल्याशिवाय कळत नाही. आईसोबत जास्त वेळ जात असल्याने बऱ्याचदा 'धपाटे' खावे लागतात आणि ते दोन प्रकारचे असतात हे नव्याने कळते. वडिलांचा 'ओरडा' जरी खाल्ला तरी एका झटक्यात सगळं काही व्यवस्थित करू लागतो आणि 'फटके' खाण्यापासून वाचतो.

शाळेत प्रवेश घेतला. वहीची 'पानं' खाल्ली; म्हणून बऱ्याचदा बाईंनी वर्गाबाहेर काढलं. लहान इयत्तेत असताना 'टिंब' गिळायचो, मोठा होऊ लागलो तसा काना, मात्रा, वेलांटी खाऊ लागलो. उत्तर व्यवस्थित पाठ नसेल तर ते उत्तर तोंडी परीक्षेत वेगात बोलताना 'शब्द' तर लेखी परीक्षेत मी 'वाक्य' खात असे. काहीजण चित्रकलेत किंवा हस्तकलेत 'लाईन' खायचे आणि त्यामुळे पाठीवर 'बुक्के'ही. काहीजण मोठे 'परिच्छेद' खात तर काहीजण कवितेच्या ओळी. निकाल लागला की त्यांना कळायचं की त्यांनी परीक्षेत 'गटांगळ्या' खाल्लेल्या. बरेच जण एखाद्या शिक्षकाला जबाबदार धरायचे कारण त्यांनी दुसऱ्या शिक्षकाचा 'तास' खाल्लेला असायचा.

सुट्टीत आपलं कारटं- कारटी ‘जीव’ खातील म्हणून सर्वांना गावी पिटाळलं जायचं आणि मुलं सुद्धा खुश व्हायची. मस्तपणे गावाची ‘हवा’ किंवा ‘ कोवळं ऊन’ खात. ‘गोते’ खाणाऱ्या पतंगासाठी लांबपर्यंत धावायचं. क्रिकेटचे सामने रंगायचे, फलंदाज ‘बॉल’ खायचा आणि त्यामुळे इतरांच्या ‘शिव्या’सुद्धा.

कॉलेजमध्ये श्रीमंतांची मुलंमुली ‘भाव’ खाताना दिसायची तरीही एक तरी ग्रुप तयार व्हायचा आणि पिक्चरला जायचा बेत ठरायचा. पडद्यावर काही कलाकार ‘फुटेज’ खाताना दिसायचे; पण कसलेला कलाकार अगदी कमी वेळ समोर येऊन त्याने दुसऱ्या अभिनेत्याला अभिनयात खाल्लं असे काहीजण म्हणत. काहीजणांनी वाचन इतकं केलेलं असायचं की तो पुस्तकं वाचतो की चावून खातो असा प्रश्न पडतो.

बेढब सवयी, विचित्र स्वभाव, घाणेरड्या सवयी किंवा हलका खिसा यामुळे प्रेमाच्या विषयात ‘माती’ खाणारे बरेचजण सापडतात आणि सुंदर असूनही उंचीने मार खाल्लेल्या मुली नाकारल्या जात. ज्यांचं जमलं त्यांच्याबद्दल बरेच जण ‘खार’? किंवा ‘दातओठ’? खाताना दिसायचे.

बस-रेल्वेत लोकांचे ‘धक्के’ खात प्रवास करताना वाहन कधी ‘पलटी’ खाईल सांगता येत नाही. आजूबाजूला, छेडछाडी करणाऱ्यांना ‘चप्पल’ खावी लागायची. ‘शेण’ खाणाऱ्या नराधमाला लोकांकडून ‘जोडे’ खावे लागायचे. कॉलेजचे दिवस संपले. हळूहळू पुस्तकं ‘धूळ’ खात पडू लागली. आणि मग सामान्य नागरिक म्हणून रस्त्यावर आलो. सहप्रवासी, सहकर्मचारी , बॉस

'डोकं' का खातात असा प्रश्न पडू लागला आणि आपण लहान असताना पालकांनी किती 'खस्ता' खाल्ल्या हे कळून चुकलं.

घरी जाऊन थोडा 'दम' खाईन तर मोबाईल इतका वाजतो की समजू लागलं की बोलताना हा मोबाईल ' बॅटरी' खातो. याच मोबाईलने घड्याळाचं 'मार्केट' खाल्लं नाही का? आजच्या वेगवान जीवनशैलीत घड्याळ 'पाणी' खातंय असा अनुभव येतो का?.

गरजा वाढत गेल्या आणि घरात वस्तूंची संख्या वाढू लागली आणि त्या 'जागा' खाऊ लागल्या. अगदी महागाईनेसुद्धा 'उचल' खाल्ली. घर शोधण्याच्या निमित्ताने बाहेर आलो की बिल्डरबरोबर बोलताना 'अपमान' गिळावा लागतो हे कळलं. पैशांचा तुटवडा होण्याचं कारण मॅनेजमेंट 'बोनस' खायची. तरीही घर घेतलं आणि बँका व्याज खाऊ लागल्या. 'पेट्रोल' खाणारी बाईक विकावी लागली. घर आणि गाडी विकताना दलालांनी 'कमिशन' खाल्लं. निरीक्षणातून कळत गेलं की बिल्डरांनी अनेकांच्या 'जमिनी' गिळल्या. या बिल्डरांच्या खिशात एकमेकांची 'मतं' खाणारे राजकीय पक्षसुद्धा आहेत, आणि 'पैसे' खाणारे अधिकारी सुद्धा आहेत.

देश स्वतंत्र होण्यासाठी कित्येकांनी 'लाठ्या' खाल्या, 'लाथा' खाल्ल्या. आजही कित्येकजण सीमेवर आणि देशाच्या अगदी आतही बंदुकीच्या 'गोळ्या' खायला तयार आहेत; पण हे 'लाच' खाण्यात व्यस्त! 'चारा' खात खात पूर्ण देश विकून खाल्ला या राजकारण्यांनी. किमान एक दिवस या सर्वांना 'तुरुंगाची हवा' खाताना पहायचं आहे. आता कुंपणच 'शेत' खातंय

म्हटल्यावर दाद कोणाकडे मागायची म्हणून मूग गिळून गप्प बसलो, आवंढा गिळला....      सगळं निमूटपणे सहन करावं लागतं....आणि मग माझं मन मला खातं, खरंच माझं मन मला खातं.



# पहिला विमानप्रवास

## ('पहिले पाऊल' या पुस्तकातून)

दिल्लीला युथ हॉस्टेलजवळ टॅक्सी मागवली होती. टॅक्सीचालकला 'न्याय मार्ग' शोधावा लागला. तिथेच कित्येक महिने टॅक्सी चालवणाऱ्याला आम्ही नकाशा न पाहता 'युथ हॉस्टेल'पर्यंतचा मार्ग मोबाइलवर तोंडी सांगत होतो इतकं आमचं फिरून झालं होतं. काही वेळाने तो टॅक्सीचालक आला.

डोमेस्टिक एयरपोर्ट. देशांतर्गत प्रवासासाठी विमानतळ. सकाळच्या अजिबात रहदारी नसलेल्या प्रशस्त रस्त्यावरून गाडी भरधाव धावू लागली. आम्हालासुद्धा याच, किंबहुना जास्त वेगाने शरीराला घरी पोहचवायचे होते, कारण...मन घरी वाट पाहत होते. टॅक्सी थांबली तेव्हा, विमानतळाजवळ आल्याचे माहीत  पडले. सामान सांभाळणारी बाबागाडी वाट पाहत होती. पाठीवरचे वजन गाडीवर लादले आणि एका क्षणात कमरेतून वाकणारी चाल आपोआपच सरळ झाली. आपल्यासाठी इथल्या सर्व गोष्टी नव्या आहेत,पण 'नवीन नाहीत' अशा चालीमध्ये सहजता आणण्याचा बेगडी प्रयत्न करत होतो; पण नजर मात्र प्रत्येक गोष्टीकडे कुतुहलाने पाहत होती अगदी लहान बाळासारखी.

इतक्या गरम हवामानात काही जण अंगावर कोट चढवून का आले? तर काही जण वारंवार इथे येऊन पहाटेच्या उठण्याला किती कंटाळत

असतील? कुठली रांग नेमकी कोणत्या कारणासाठी? बरं, ते जाऊ दे. सगळ्यात आधी सांगा, ‘आमचं विमान कुठे? फलाटाला कधी लागणार?...’

बराच वेळ होता. इंटरनेटद्वारे घेतलेली प्रिंट दाखवून सर्वांची तिकिटे मिळवली. स्वतचे सर्व सामान तपासणीसाठी देताना सर्व वस्तू काढून दाखवायच्या, असे आतापर्यंत ऐकल्याने पुन्हा बॅग भरायची कल्पना नकोशी होती. पण बॅग दिली आणि अधिकाऱ्याने तिचे वजन करून ती मागे ठेवली आणि ती स्वत:च प्रवासाला निघाली. किंचित तिची काळजी वाटली. हिमालयीन ‘सर पास’ ट्रेकसाठी आधी दिल्ली ते मनाली हा सुरुवातीचा प्रवास करताना स्वतः बसवर चढून बॅग बांधली होती. विमानात काय, कशी व्यवस्था असते? प्रश्न, प्रश्न आणि फक्त प्रश्नच......

विमानतळावरच महागडा पण गरजेमुळे ब्रेकफास्ट केला. जास्त किंमत असल्याने तो छानच होता. नाही, खरोखरच छान होता. सर्वांची पोटपूजा झाली आणि रांगेत उभा राहिलो. मला माझा सर्व मित्रांचे निरीक्षण करायचे होते, पण आपोआप त्यांच्यापासून खूप पुढे मी रांगेत असल्याचे कळाले. मनाला गुदगुल्या होत होत्या आणि तपासणी करून घेताना शरीरालाही. शब्द सोडून एकही धारदार वस्तू माझ्याकडे नव्हती.हिमालयात ट्रेक करताना ती मोरपिसासारखी, नंतर झालेल्या अपघातात ती बोथट झालेली, दिल्लीतल्या प्रवासात म्यान केलेली, तर ताजमहालात गुलाबासारखी वावरली होती. आता ती पतंगासारखी झेपावणार होती. जिचे दोर आईच्या हातात पाळण्यासारखे नाजूकपणे पकडले गेले होते.

सूचनेप्रमाणे सर्वांनी १९ क्रमांकाच्या दरवाजाकडे जायचे होते. निघालो. तिथे आम्ही सर्वजण रिकाम्या खुर्च्या पाहून बसून राहिलो. विमानात बसण्याआधी जणू काही फक्त बसून राहायचं सराव करायचा असतो! बाजूला मोठ्या रांगा लागत होत्या. आमचे कोणाचेही तिथे लक्ष नव्हते. अगदी दुर्लक्षही नव्हते. कारण चालत्या विमानात चढायचे तंत्र माहीत नव्हते.

मुंबईला जाणाऱ्या यात्रेकरूंनी दरवाजा क्रमांक १९ कडे रंग लावायची सूचना झाली. इतका वेळ समोरच ज्या रांगेकडे पाहत होतो, तीच आपली रांग असल्याचे नुकतेच कळाले. रांगेतून चालू लागलो. सामान कुठे दिसत नाही, म्हणून प्रश्नही होताच. इकडे-तिकडे गडबडीने पाहत काचेच्या दरवाजापाशी थांबलो. पुढे उभे असलेले सर्वजण एका भरगच्च भरलेल्या बसमधून निघून गेले आणि विमानतळावर आकाराने थोड्या मोठ्या चार ते पाच पांढऱ्या चिमण्या दिसल्या. यांना पाहण्यासाठी दुर्बिणीची गरज नव्हती. पांढऱ्याशुभ्र, त्यावर निळी छोटीशी पट्टी, शेपटीही निळ्या रंगाची. एक चिमणी उडून गेली, दुसरी तयारीत होती. इतक्यात एक बस आडवी आली. लगेचच बसमध्ये शिरलो. खिडकीतून चिमण्यांचे फोटो काढले. निळ्या रंगाची पट्टी ही इंग्रजीतली अक्षरे होती ‘INDIGO’ (इंडिगो).

बस थांबली. विमानाच्या दरवाजापर्यंत लावलेल्या वलयाकार सपाट जागेवरून घसरून खाली उतरलो होतो. गालातल्या गालात हसता-हसता ओठही हसू लागले.. विमानात पहिले पाऊल पडले आणि दरवाजावरही शंभर पटीने गोड हसू देत कोणी तरी आमचं स्वागत केलं. मीही लाजलो. आता

पलीकडचा प्रवासी 'या या जावईबापू, घर शोधताना त्रास नाही ना झाला?' असे म्हणणार की काय, असे वाटू लागले. पण माझ्यामागेही काही जावईबापू होते. मागून येणारा मुकेश व मी आमची जागा शोधत असतानाच ' May I Help you ?' असा आवाज आला आणि मनात रोमँटिक गाणे वाजू लागले. दबक्या आवाजात सीट नं. २३ म्हटलं. मुकेश खिडकीजवळ, त्याच्याशेजारी मी आणि मुकेशच्या पुढच्या जागेवर विशाल असे तिघेही बसलो.

ज्यांनी आपल्यासोबत काही सामान घेतले होते, ते त्यांनी वरच्या जागेत ठेवायला सुरूवात केली. त्याचे दार लावताना काहीजण विनाकारण ताकद लावत होते. पण बुद्धीने हुशार आणि कामात तत्पर अशा सुंदर तरुणी प्रत्येकाच्या मदतीला धावून येत होत्या. अगदी नाजूक हातांनी जड सामान ठेवल्यानंतर ते दारही लाजून अलगद बंद होत होते.

सर्व जण आपापल्या जागी. विमानाचे दार बंद, आतमध्ये पुरेसा प्रकाश, वातानुकूलित हवा, डोक्यावर हवेचा झोत बदलणारे ब्लोअर. सर्व काही सुटसुटीत, टापटीप, स्वच्छ. खिडकीतून बाहेर पाहिल्यास विमानाचे पंख मागच्या खुर्चीपासून सुरू झालेले.



बऱ्याच वर्षांपूर्वी राईट बंधूंनी विमानाचा शोध लावला. त्याआधीही कोणी तरी प्रयत्न केले होते. संत तुकोबांसाठीही वैकुंठवासी जाताना पुष्पक विमान आले

होते. रावणानेही सीतेला विमानातून पळवल्याचे टीव्हीवर पाहिले होते. म्हणजे विमानाचा शोध फार आधीच लागला असताना, विमानातल्या खुर्चीचा पाठ टेकवायचा भाग मागे कसा जातो याचा विशालने शोध लावला. त्याने चूक केली की, हा शोध त्याने आम्हाला सांगितला आणि मागे बसलेल्या आम्ही दोघांनी तितक्याच गंभीरपणे त्याचे अभिनंदन केले. इथून पुढे दोन तास आम्हाला एकमेकांच्या अशा विनोदांना सामोरे जायचे होते. विमानाचे दार बंद झाल्याने पर्याय नव्हता.

विमान मागे सरकू लागले. झेप घेण्यासाठी धावपट्टीवर योग्य दिशेने जाण्यासाठी वळणे घेऊ लागले. थांबले. चक्क वैमानिक काहीतरी बोलला. आम्ही लक्षच दिले नाही. लगेचच मंजूळ आवाज आला. यावेळी मात्र आम्ही लक्ष देऊन एकेक शब्द ऐकू लागलो. दुसरी एक मंजूळा स्वतःच्या हावभावाने सूचना देत होती. कोणत्याही भाषिकाला समजेल अशी सूचना देणारी मुक्यांची भाषा सर्वांत ग्रेट, हे कळाले. हिमालयात ट्रेक करताना अर्ध्या वाटेवरून मागे फिरण्याची सूचना येताना आणि पुन्हा शिखरावर पोहोचताना कुत्र्याची भाषाही मुक्याचीच होती. कमरेचा पट्टा, ऑक्सिजन, आपत्कालीन सुविधा, पॅरॅशूट, इतक्या गोष्टींची माहिती देणारी, सर्वांची काळजी घेणारी, हसमुख, एखाद्या टी.व्ही. मालिकेतल्या नायिकेसारखी मंजुळा आवडली. विमानाच्या आत यांना सोडून पाहण्यासारखे दुसरे काहीही नव्हते.

विमान ‘रनवे’वर आले. शांत, स्तब्ध, तितकेच उडण्यासाठी सज्ज. आम्ही उलट्या क्रमाने अंक मोजू लागलो. तीन-चार वेळा झालं असं. मध्येच

इंजिनचे सूर कानापर्यंत पोहचले...... विमान चालू लागले.... धावू लागले.... जोरात ... अजून जोरात धावू लागले. आजूबाजूच्या सर्व गोष्टी घाबरून तितक्याच वेगाने मागे पळू लागल्या. हवेला कापत, 'रनवे'ला मागे सोडून, खूप वेगाने..... आणि जमीन किंचित तिरपी झाली आणि हळूहळू झुकू लागली. जमिनीचा निरोप घेतला. विमानाचा कोन काही काळ तसाच. हळूहळू तो कोन जाणवायचे कमी झाले. दहा ते पंधरा मिनिटांनी कमरेला बांधलेला खुर्चीचा पट्टा सोडण्याची सूचना झाली. आता खिडकीतून बाहेर बघण्यासाठी चुळबूळ सुरू झाली. मधल्याच सीटवर बसल्याने ती कोठूनही दिसेल अशीच होती. एकेक झाड एकेका पानासारखे, बंगले पत्त्यांच्या बंगल्यासारखे, पाण्याचा प्रवाह प्लॅस्टिकच्या तुकड्यासारखा. बाकीच्या वस्तू ओळखण्याआधीच नवे काहीतरी दिसू लागले.

इतर प्रवाशांच्या हालचाली सुरू झाल्या. काहीजण गाढ झोपले होते. काहीजण फ्रेश होण्यासाठी मधल्या जागेतून चालू लागले. काहीजण एकमेकांशी बोलण्यासाठी उभे राहू लागले, जागा बदलू लागले. हे सर्वजण नवे आहेत असं वाटत होतं. माझ्या उजव्या बाजूला एक तरुण लॅपटॉपवर चित्रपट पाहत होता. विमानप्रवासाची मजा याला माहीत नव्हती. हा पण नवीनच होता वाटलं. फक्त आम्हीच काय ते रोजचे प्रवासी होतो. जागेवरून ढीम्म हलत नव्हतो.

खिडकीतून बाहेर दूरवरचे दृश्य चार-पाच दिवसांपूर्वी पाहिल्यासारखे. सर्वत्र फक्त हिमच हिम. हिमालयवर  जो पडतो त्याला हिम म्हणतात

बर्फ नाही.  दाटीवाटीने जमा झालेले ढग बराच वेळ आमच्या सोबतच. अगदी काही वेळातच पाणी, शीतपेय वगैरे घेऊन दोन्ही हवाईसुंदरी आल्या. आम्ही हिमालयात मिळवलेले पहिले यश अजून साजरे केले नव्हते. पंचांग आणि याक्षणी सतत बदलणाऱ्या वास्तुशास्त्रानुसार ही जागा यश साजरा करण्यासाठी योग्यच वाटली. आधी पाणी आणि तिघांसाठी वेगवेगळ्या प्रकारातले पेय अगदी प्रेमाने मागितले. हवाईसुंदरींनी ते प्रेमाने दिले. उंचावर थंडी जास्त असते तरीही ते पेय अपेक्षेपेक्षा कमी थंड होते. मुलगी बघण्याचा कार्यक्रम मित्रांकडून ऐकला होता. त्यामुळे आता कदाचित ‘कांदेपोहयां’साठी विचारणार की काय, असे वाटत असतानाच तिने पेयांची एकूण किंमत सांगितली. मुलगी व्यवहारातही हुशार तरीही नम्र वाटली. दुसरीसुद्‌धा. पेयांच्या डब्याला अलगद डबा टेकवून आनंद व्यक्त केला.

आमची आमच्यातच मस्ती सुरू होती. आधी पाहिलेले ढग बऱ्याच वेळानेही तिथेच होते. विमानाचा वेग कमी झाला की काय ? कोणत्या शहरावरून विमान चालले आहे ? राजस्थानचे वाळवंट दिसेल का ? हवेत उडणारे पक्षी ? त्यांच्या किती उंचावरून आपण उडत आहोत? असे सर्व प्रकारचे प्रश्न हवेत विरळत होते. हवाईसुंदरी त्यांचे काम झाल्यावर अगदी पुढे गेल्या. कोणतीही कृती करण्याआधी त्या पडद्‌याने झाकून स्वतःचे अंगविक्षेप व चेहऱ्यावरचे भाव लपवत असाव्यात कदाचित. या कोड्‌याची उकल झालेली नाही.

गप्पा कंटाळल्या. उत्खनन करून काढलेले विनोदही संपत होते. मागील सोळा दिवसांच्या प्रवासात रेल्वेत किंवा बसमध्ये, वळणांमुळे किंवा मधल्या स्थानकांमुळे प्रवास सुरू आहे, असे किमान जाणवत तरी होते. पण विमानात मात्र नक्की विमान पुढे जात आहे ना, याची चौकशी करावीशी वाटली. पाच-दहा मिनिटे गप्प बसून राहिलो. मुंबई जवळच आले असल्याची बातमी आणि कमरेला पट्टा लावण्याची सूचना झाली. कमरेचा पट्टा मुद्दामच बांधायचा नाही, असे मनाशी ठरवले.

खिडकीतून बाहेर पाहताना आता जहाज दिसत होते, तेसुद्धा माचिसवरच्या चित्रासारखे. पण पायलट इतका पुढे कसा विमान घेऊन गेला? इतक्या उंचीवरून मुंबई शोधणं तसं कठीणच, म्हणून पायलटला समजून घेतले. आता विमान थोडे खाली झुकू लागले. कमरेचा पट्टा बांधला नसला तरी तो केंव्हाही बांधता यावा म्हणून पकडून ठेवला. मुंबापुरी जवळ येताच 'मढ आयलँड' येथील पॅगोडा ही वास्तू दिसली. देवघरातल्या घंटीप्रमाणे दिसणाऱ्या 'पॅगोडा'ला मुंबापुरीभोवती ओवाळून प्रवेश करावेसे वाटले.



विमानाचा कोन पुढच्या बाजूने झुकलेला. दिल्ली सोडताना मागे वळून पाहिले तर धरणी नतमस्तक झालेली, तर मुंबईत उतरताना आभाळ अगदी आभाळमायेने तिला आशीर्वाद देत होते.

आतापर्यंत शून्य वाटणारा विमानाचा वेग रनवे दिसल्यावर जाणवू लागला. हातात सैल पकडलेला पट्टा थोडा घट्ट पकडला. कारण इतक्यात मी बराच पुढे झुकलेलो होतो. माझ्या बाजूचे माझ्यापेक्षा कमी झुकलेले. त्यांना पाहून खिडकीतून बाहेर पाहिल्यावर विमान जमिनीला समांतर...... आणि आजूबाजूचा परिसर वादळी वेगाने मागे जात असलेला... तुफानी... तुफानी वेग.....'वेग' हा शब्द लिहून होईपर्यंत विमान किती पुढे जाईल याचा अंदाज नाही आणि दिल्लीत ऐकलेले इंजिनचे सूर आत्ता मुंबईत पोहोचेपर्यंत वरच्या 'सा'पर्यंत पोहोचलेले..... आणि त्या महाकाय गरूडाने महाराष्ट्रभूमीवर घसरतच साष्टांग लोटांगण घेतले. अगदी काही क्षण आधी मी पट्टा लावला, बांधला व पुढच्याच क्षणी एक हलकासा झटका अनुभवला. प्रत्यक्षात तो किती असतो आणि प्रवाशांच्या वाटेला किती येतो याचा अंदाज न केलेला बरा. 'रनवे'वरचा विमानाचा वेग शून्यापर्यंत आला.

मुंबईचे तापमान ३०° असल्याचे पायलटने सांगितल्याचे कानांवर आले. हिमालयातले शून्य अंश लगेचच दिल्लीतले ४०° तापमान सहन केल्यानंतर ३०° सेल्सिअसने कानांना खूप छान ऊब, प्रसन्न वातावरण दिले. अवघ्या दोन तासांतच देशाच्या 'दिला'तून मजबूत 'आर्थिक कण्या'पर्यंत प्रवास होऊ शकतो, यावर विश्वास बसत नव्हता. अगदी नेम धरून, स्वतःभोवती आणि सूर्याभोवती फिरणाऱ्या पृथ्वीवर मुंबई शोधून त्यावर योग्य 'रनवे'वर विमान उतरवल्याबद्दल पायलटचे कौतुक. एकेक करून घाई करत सर्व प्रवासी उतरण्यासाठी घाई करू लागले. हे सर्वजण

नवीन होते ना? उतरताना दरवाजापाशी उभी असलेल्या ‘मंजुळे’ने पुन्हा स्मित केले. ‘तुम्ही पण येणार का?’ विचारायच्या आधीच तिने माझ्या मागे असलेल्या व्यक्तिला पाहून स्मित केले. नकोनकोसा पण माहीत असलेला अपेक्षित अपेक्षाभंग झाला आणि दरवाजावर ही ‘आमची महामुंबई’.

पण दिल्लीत सोडलेलं स्वतःचं पाठीवरचं गाठोडं कुठे? घाईघाईने बसमध्ये शिरलो. या बसमध्ये सगळ्यात पहिला शिरून कोपऱ्यात जाऊन बसलो. बसमध्ये गर्दी झाली. वळून पहिले, तर चिमणीदेखील आपल्या पुढच्या प्रवासाला की आराम करायला निघाली. बसमधून सर्वांत शेवटी उतरलो. आता पहिले स्वतःचे सामान शोधा. लाकूडतोड्याच्या गोष्टीप्रमाणे सोन्याची, चांदीची बॅग समोरून गेलीही, पण आधी प्रामाणिकपणे स्वतःची बॅग हवी होती. नंतर पाहिजे तर अश्मयुगीन दगडी कुऱ्हाड म्हणजे झोळी द्या. म्हणता म्हणता हसत-खेळत बॅग आली.

शाळेतून घरी येईपर्यंत विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझेही असेच घरी आले तर ?

पहिले पाऊल (सर पास- हिमालयीन गिर्यारोहण अनुभव)- संवेदना प्रकाशन (ई-पुस्तक खालील लिंकवर उपलब्ध)

https://www.bookganga.com/eBooks/Books/Index?BookSearchTags=Pankaj%20Ghare&BookType=1

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची

चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान